डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ व्या जयंती वर्षानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर व राजर्षी शाहू महाराज यांचे माणगाव ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथे स्मारक उभारण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक: सान्यावि-२०१६/ प्र.क्र.४६७/ बांधकामे

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ३० मार्च, २०१८.

वाचा :-

१) शासन निर्णय क्र. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सान्यावि-२०१५/प्र.क्र.१६३/ बांधकामे, दि.९/१०/२०१५

२) शासन निर्णय क्र. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग बैठक- २०१६/ प्र.क्र.४७५/ बांधकामे, दि.२४/३/२०१७

३) आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांचे पत्र क्र.सकआ/मावक/डॉबाआंवराशाम/ ऐति.स्थळ/ २०१७-१८/का.१२/१६०५, दि.१०/११/२०१७.

४) प्रादेशिक उपआयुक्त, समाज कल्याण, पुणे विभाग, पुणे यांचे पत्र क्र.प्राउपुवि/ मावक/ माणगाव/प्रवेशद्वार/२०१७-१८/४१५३, दि.३/११/२०१७

प्रस्तावना :-

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त अनुसूचित जाती व नवबौध्द घटकासाठी ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्टया महत्व असलेल्या स्थळांचा विकास करणे या अंतर्गत संदर्भ क्र.१ अन्वये मा.मंत्री (सा.न्या.वि.स.) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीच्या दि.१/८/२०१६ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तासोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये अनुसूचित जाती नवबौध्द घटकासाठी ऐतिहासिक व सांस्कृतीकदृष्टया महत्व असलेल्या एकूण २८ ठिकाणे/स्थळांची यादी अंतिम करण्यात आली असून त्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर व राजर्षी शाहू महाराज यांचे माणगाव ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथे स्मारक उभारण्यासाठी रु.२ कोटी निधी मंजूरी बाबत संदर्भीय क्र.२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन संदर्भ क्र. ३ अन्वये आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांच्यामार्फत डॉ.बाबासाहेब आंबेडकर व राजर्षी शाहू महाराज यांचे माणगाव ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथे स्मारक उभारण्यासाठी रु.२,००,००,०००/- व संदर्भ क्र.४ अन्वये प्रादेशिक उपआयुक्त, समाज कल्याण पुणे यांच्यामार्फत डॉ.बाबासाहेब आंबेडकर व राजर्षी शाहू महाराज यांचे माणगाव ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथील प्रवेशद्वार उभारणीसाठी रु.१४,००,०००/- अशा एकूण रु.२,१४,००,०००/- इतक्या रकमेचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सदरहू कामांच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून परिगणित करण्यात आलेल्या रु.२,३८,६३,०००/-(रुपये दोन कोटी अडतीस लक्ष त्रेसष्ट हजार फक्त) इतक्या सुधारित रक्कमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय :-

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर व राजर्षी शाहू महाराज यांचे माणगाव ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथे स्मारक उभारण्यासाठी रु.२,००,००,०००/- व प्रादेशिक उपआयुक्त, समाज कल्याण पुणे यांच्यामार्फत डॉ.बाबासाहेब आंबेडकर व राजर्षी शाहू महाराज यांचे माणगाव ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथील प्रवेशद्वार उभारणीसाठी रु.१४,००,०००/- अशा एकूण रु.२,१४,००,०००/- इतक्या रकमेचा प्रस्ताव सादर करण्यात आला असता सदरहू कामांच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून परिगणित करण्यात आलेल्या अशा एकूण

रु.२,३८,६३,०००/- (रुपये दोन कोटी अडतीस लक्ष त्रेसष्ट हजार फक्त) इतक्या सुधारित रक्कमेच्या अंदाजपत्रकास खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे:-

<u>अटी व शर्ती</u> :-

१) सदर काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात यावे.

२) काम सुरु करण्यापूर्वी नमुना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तुविशारदांकडून मंजूरी घेऊन सुरु करावे.

३) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतुदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घ्यावे.

४) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/प्र.क्र. १७७/तां.क.१, दि.१० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

५) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णयक्र.बीडीजी-२०१७/प्र.क्र.६०/ इमारती- २, दि.७/७/२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

२. प्रस्तुत कामावरील खर्च हा संदर्भ क्र.२ येथे नमूद दि.२४/३/१७ च्या शासननिर्णयातील परिच्छेद २ नुसार कार्यकारी अभियंता तथा समन्वयक, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांचे अधिनस्त ठेवण्यात आलेल्या निधीतून करावा.

३. या करीता आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून, त्यांनी या कामासाठीचा निधी, वित्त विभागाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार त्या त्या टप्प्यावर सदरहू कामाकरीता वितरीत करावा.

४. प्रस्तुतचा शासन निर्णय, दि.९/१०/२०१५ च्या शासन निर्णयान्वये गठित समितीस प्राप्त अधिकार तसेच वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उपविभाग-पाच, अनु.क्र.१ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परि.क्र.१३४ खाली प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थहावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३३११०१९०८४०२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vishakha Sachin Adhav

Digitally signed by Vishakha Sachin Adhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1d4700e952a830d47e7b2f63ad9254269391a93afec7d28ddf93bcbec52721ac, cn=Vishakha Sachin Adhav
Date: 2018.03.31 10:20:06 +05'30'

(वि.स.आढाव)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे.

२) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम (प्रा) विभाग, पुणे.

३) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर.

४) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर.

५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षा), महाराष्ट्र१/२, मुंबई/ नागपूर.

६) प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, पुणे.

७) सहायक आयुक्त, समाजकल्याण, कोल्हापूर.

८) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/ कोल्हापूर.

९) अध्यक्ष, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व राजर्षी शाहू महाराज यांचे स्मारक समिती, माणगाव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर.

१०) निवडनस्ती / बांधकामे.